अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर टॅन क्रमांक,
पॅन क्रमांक इत्यादि माहिती भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधेचा आहरण व संवितरण अधिका-यांनी वापर करण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक : आयकर १००७/प्र.क्र.१३९/कोषा-प्र-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ ऑक्टोबर, २००८

वाचा - १) परिपत्रक वित्त विभाग क्रमांक : आयकर १००७/प्र.क्र.१३९/कोषा प्र-५, दि. ४.१.२००८

२) शासन निर्णय वित्त विभाग क्र. डीडीओ-१००७/प्र.क्र.६२/कोषा प्र-५, दि. ७.४.२००८.

**परिपत्रक** - आहरण व संवितरण अधिका-यांना करावयाच्या प्रदानाबाबत तसेच आयकरासंबंधी यापूर्वी उपरोक्त संदर्भांकित परिपत्रक व शासन निर्णयाद्वारे शासनाने विविध सूचना निर्गमित केल्या आहेत. या सूचनांच्या अनुषंगाने अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

यासंदर्भात शासनामार्फत पुढीलप्रमाणे सुविधा वापरण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत

१. आयकर अधिनियम १९६१ अनुसार आयकर कपात करण्याची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची आहे. आयकर विभागाकडून आहरण व संवितरण अधिका-यांनी कपात केलेल्या आयकरासंबंधी वेगवेगळया विवरणपत्राची मागणी केली जाते. याबाबतच्या सूचना यापूर्वीच क्रमांक १ समोरील परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. महाराष्ट्र शासनाने सन २००७-०८ पासून अर्थसंकल्प वितरण प्रणाली लागू केली आहे. अर्थसंकल्प वितरण प्रणालीत ज्या व्यक्तीस प्रदान करावयाचे आहे, त्याचा तपशिल मिळत असल्यामुळे अर्थसंकल्प वितरण प्रणालीतून आयकर विवरणाबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस आहे. आयकर कपातीबाबत अचूक माहिती उपलब्ध व्हावी व सदर परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांचे पालन व्हावे याकरीता दि. १ नोव्हेंबर, २००८ पासून अर्थसंकल्प वितरण प्रणालीमार्फत देयक प्राधिकार पत्र तयार करताना (TAN) टॅन क्रमांक, (PAN) पॅन क्रमांक नमूद करण्याबाबतची सुविधा वापरणे बंधनकारक करण्यात येत आहे. टॅन व पॅन क्रमांक नमूद केल्याशिवाय देयक प्राधिकार पत्र अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे प्राप्त होणार नाही.

३. आहरण व संवितरण अधिका-यांकडे टॅन क्रमांक नसल्यास त्याबाबत अर्ज सादर करण्याची सुविधा (संकेतस्थळ) अर्थसंकल्प वितरण प्रणालीमार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ज्या आहरण व संवितरण अधिका-यांनी अद्याप टॅन क्रमांकासाठी अर्ज केला नसेल त्यांनी अर्ज सादर करुन त्याची नोंद देयक प्राधिकारपत्र तयार करताना टॅन क्रमांक या रकान्यात करावी. तथापि दि. ३१.१२.२००८ पर्यंतच टॅनसाठी अर्ज सादर केल्याचा क्रमांक व दिनांक नमूद करुन देयक प्राधिकारपत्र तयार करता येईल. त्यानंतर प्रत्यक्ष टॅन कमांक नमूद केला तरच

अर्थसंकल्प वितरण प्रणालीमार्फत देयक प्राधिकारपत्र प्राप्त होईल. टॅन कमांक नमूद केला नाही तर अर्थसंकल्प वितरण प्रणालीमार्फत देयक प्राधिकारपत्र प्राप्त होणार नाही.

४. स्वयं आहरण व संवितरण अधिका-यांच्याबाबतीत आयकर कपात करणा-या अधिका-याचा टॅन (TAN) क्रमांक देयकावर नमूद करण्यात यावा.

५. तसेच क्र. २ समोरील शासन निर्णयान्वये आहरण व संवितरण अधिकारी यांना करावयाची सर्व प्रदाने बँकेमार्फत करण्याचे तसेच शक्य त्या सर्व ठिकाणी ECS/EFT ह्या इलेक्ट्रॉनिक पध्दतीचा वापर करुन प्रदान करावयाचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी करणे सुलभ व्हावे या दृष्टीकोनातून सर्व आहरण व संवितरण अधिका-यांनी ज्या व्यक्तीस / संस्थेस रक्कम प्रदान करावयाची आहे, त्या व्यक्ती / संस्थेच्या बँकेचे नांव, शाखा, खाते क्रमांक इत्यादि तपशिल देयक प्राधिकारपत्रात अचूक भरल्याशिवाय अर्थसंकल्प वितरण प्रणालीमार्फत देयक प्राधिकार पत्र प्राप्त होणार नाही. तसेच नवीन प्रदान कर्त्याचे नांव, आहरण व संवितरण अधिका-यांच्या फायनल मोडमध्ये प्रमाणित करण्याची सुविधा देण्यात आली आहे.

६. सदर परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००८१०१७१५३१३६००१ असा आहे.

( दि.वा. जोशी )
कार्यासन अधिकारी,

प्रति,
मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग
मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (१० प्रती)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई(१० प्रती)
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (१० प्रती)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र नागपूर (१० प्रती)
आयुक्त, आयकर (टीडीएस), श्रीमती के.जी.मित्तल आर्युवेदिक हॉस्पीटल बिल्डींग, खोली क्रमांक ९०० ब, ९वा मजला, चर्नीरोड (पश्चिम), मुंबई ४०० ००२
अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे / मुंबई (१० प्रती)
सर्व कोषागारे
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
निवड नस्ती, कोषा ५